



REGISTERED No. B. 3434

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १८ डिसेंबर १९४६ अंक ४१

श्री श्री श्री श्री श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री

## विविध माहिती

**नवे इंजिनिअरिंग कॉलेज**—अहमदाबाद येथें एक नवें सरकारी इंजिनिअरिंग कॉलेज जून, १९४८ पासून सुरू होईल. पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजमधील अभ्यासक्रमच नव्या कॉलेजास लागू केला जाईल. डिप्लोमा वर्ग जून, १९४७ मध्येंच सुरू होतील.

**टारिफ बोर्डाच्या सभासदांची संख्या वाढणार**—हिंदी टारिफ बोर्डाकडे संरक्षणासाठीं अधिकाधिक धंद्यांच्या चौकशीचें काम सोपविण्यांत येत आहे. त्यामुळें, चौकशी लवकर संपून बोर्डाच्या शिफारसी सरकारास कळण्यास वेळ लागतो. हा विलंब टाळण्यासाठी, टॅरिफ बोर्डाच्या सभासदांचे संख्येंत वाढ करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. सभासद वाढले, म्हणजे एकाच वेळीं ज्यास्त धंद्यांच्या चौकशीचें काम बोर्डास चालवितां येईल.

**पोलिश निर्वासितांचें प्रयाण**—हिंदुस्थानांतील पोलिश निर्वासितांचें स्वगृहीं प्रयाण सुरू झालें आहे. जामनगर, पांचगणी व कोल्हापूर ह्या तीन ठिकाणीं मिळून सुमारें ३,००० पोलिश निर्वासित आज आहेत.

**नवें शेतकी कॉलेज**—मुंबई सरकारनें धारवाड येथें एक नवीन शेतकी कॉलेज काढण्याचें ठरविलें आहे. या कॉलेजसाठीं नित्य स्वरूपाचा २० लाखांवर खर्च होईल व दरवर्षी ३॥ लाख रुपये खर्च होईल.

**युगोस्लाव्हिआची पंचवार्षिक योजना**—शेतकी प्रधान युगोस्लाव्हिआचें औद्योगिक देशांत रूपांतर करण्यासाठी मार्शल टिटोच्या सरकारनें एक पंचवार्षिक कार्यक्रम आखला आहे.

**अन्नधान्याचा जागतिक फंड**—संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक समितींत रशियाचे प्रतिनिधि एम. मॉन्यूको यांनीं बिकट प्रसंगीं उपयोगांत आणण्यासाठीं जो धान्याचा सांठा करण्यांत येणार आहे, त्यांत रशियाही सामील होण्यास तयार असल्याचें सांगितलें.

**हिंदुस्थानचा टिनचा वाटा**—वॉशिंग्टन येथील टिन-पुरवठा कमिटीच्या निर्णयाप्रमाणें ब्रिटिश पुरवठा-खात्यानें १९४६ च्या दुसऱ्या सहामाहीसाठी, हिंदुस्थानला २,२७५ टन टिन देण्याचें मंजूर केलें आहे.

**ब्रिटनच्या निर्यात व्यापारांत वाढ**—ऑक्टोबर महिन्यांत ब्रिटननें ९ कोटि पौंडांहून अधिक किंमतीचा माल निर्यात केला. ही निर्यात सप्टेंबरमधील निर्यातीपेक्षा २ कोटी पौंडांनीं अधिक आहे. ऑक्टोबर महिन्यांत ब्रिटनमधील आयातही युद्धोत्तर कालांत सर्वांत अधिक झाली.

**पाणाड्यांचें शिक्षण**—शेतकी खात्यांतील कांहीं लोक व बाहेरचे कांहीं लोक यांना पाणाड्यांचें शिक्षण देण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. पाणी शोधून काढणारें यंत्र वापरण्याचें व पाणी लागण्यासारख्या जागा शोधून काढण्याचें शिक्षण त्यांना देण्यांत येणार आहे. येत्या पांच वर्षांत ५० हजार विहिरी खोदण्याचें सरकारनें ठरविलें आहे. त्या योजनेंत या शिक्षितांचा उपयोग करण्यांत येईल.

**चांदीची किंमत व व्यापार**—मुंबईंत चांदीच्या किंमतींत नुकतिच जी घट झाली त्यामुळें हिंदी-ब्रिटिश व्यापाऱ्यावर फारसा परिणाम होणार नाहीं असें मत इंग्लंडचे फडणीस डॉ. ह्यू डाल्टन यांनीं कॉमन्स सभेंत व्यक्त केलें.

**कोळसा-खाणीच्या कामगारांना इशारा**—ब्रिटनचे उपराष्ट्रमंत्री मि. हर्बर्ट मॉरिसन यांनी ब्रिटनमधील दगडी कोळशाच्या खाणी कामगारांना अधिक कोळसा काढण्याचा इषारा दिला आहे. या वर्षी ब्रिटनमध्यें गेल्या हिवाळ्यापेक्षा ३० लाख टन कोळसा कमी पडणार असून त्यामुळें ब्रिटनची आर्थिक परिस्थिति दीर्घकालपर्यंत तंगीची राहील असें मत त्यांनीं व्यक्त केलें.

**म्हैसूर चेंबरचे दुसरे महाराष्ट्रीय अध्यक्ष**—म्हैसूर ग्लास अँड एनॅमल वर्क्स लि. चे श्री. शंकरराव ओगले ह्यांची म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या अध्यक्षस्थानीं निवड झाली आहे. कांहीं वर्षांपूर्वी म्हैसूर सिल्क फिलेचर्स व श्रीराम सिल्क मिल्स ह्यांचे श्री. नारायणराव नाईक ह्यांनीं हें स्थान मंडित केलें होतें.


### "अर्था"ची वार्षिक वर्गणी

जानेवारी, १९४७ पासून "अर्था"ची वार्षिक वर्गणी ६ रुपये करणें भाग पडलें आहे. तरी नव्या-जुन्या वर्गणीदारांनीं; ह्यापुढें वर्गणी पाठवितांना ह्याची नोंद घ्यावी.

—व्यवस्थापक, "अर्थ", दुर्गाधिवास, पुणें ४.

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लिमिटेड,
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणें २

### नोटिस

ता. ७ फेब्रुवारी १९४७ नंतर सिंडिकेटच्या भागिदारांना त्यांचीं डिव्हिडंड वॉरंटस रवाना करण्यांत येतील. तरी ज्या भागिदारांचे पत्ते बदलले असतील त्यांनीं आपले बदललेले पत्ते सिंडिकेटचे ऑफिसांत कळविण्याबद्दल विनंति आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.
मॅनेजिंग एजंटस.

आमचें चालू उत्पादन भाग २

### वास्तू शोभेसाठीं—

★ खिडकीच्या आकर्षक जाळ्या
★ प्रवेशद्वारें ( कांपाऊंड गेटस )
★ पाण्याच्या टांक्या
★ सरक दारें ( कोलॅप्सिबल गेटस )
★ पलंग व पाळणे

उद्यम मंडळ—२८१ शुक्रवार पेठ, पुणें,

एजन्सीज देणें आहेत.

### दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी लि.

तुम्ही दूरदृष्टीनें नियमानें ठराविक रक्कम बचत केल्यास तुम्हाला अगर तुमच्या नातेवाईकांना दरमहा निर्वेध मदत मिळण्याची आकर्षक योजना.

कंपनीकडे माहितीपत्रकांसाठीं आजच लिहा अगर भेटा.

हेड ऑफिस
८६६ सदाशिव पेठ, पुणें २

व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी.
मॅनेजर

शाखाः—कराची, धुळें, नागपूर व हुबळी

# अर्थ

बुधवार, ता. १८ डिसेंबर १९४६




संस्थापक

प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ४ रु. किरकोळ अं. २ आणे.


# शास्त्रीय प्रगतीखेरीज टिकाऊ राजकीय सत्ता आतां अशक्य

## जर्मनी, अमेरिका व रशिया ह्यांचा हिंदुस्थानापुढील कित्ता

हिंदी स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या घटना समितीच्या कार्यास ता. ९ डिसेंबर रोजीं प्रारंभ झाला. घटना समितीमधून निष्पन्न होणाऱ्या राज्यघटनेमुळें, हिंदुस्थानास आपला उद्धार हिंदवासीयांच्या हितसंबंधास अनुसरून सत्वर करतां येईल, अशीच जनतेची स्वाभाविक आकांक्षा आहे. हिंदुस्थानाचें भौगोलिक स्थान, त्याचें क्षेत्रफळ, त्याची लोकसंख्या, त्याची न सर्गिक संपत्ति, इत्यादि लक्ष्यांत घेतां आपल्या देशास फार उज्वल भवितव्य आहे आणि त्याचें आंतरराष्ट्रीय स्थान उच्च व महत्त्वाचें राहील असा लोकांना विश्वास वाटत आहे. कोणत्याहि देशाचें राजकीय महत्त्व त्या देशाच्या लष्करी सामर्थ्यावर अवलंबून रहाणें स्वाभाविक आहे. देशांतील उद्योगधंदे व कारखाने, त्याचप्रमाणें आर्थिक शक्ति ह्यांचा लष्करी बळाशी निकटचा संबंध आहे. लोकांची वृत्ती, सामाजिक जीवन, परराष्ट्रांशी संधानें बांधण्याची कुशलता, शासनपद्धति, इतकेंच नव्हे तर लोकांचे स्वतःसंबंधीं व इतर राष्ट्रांतील लोकांसंबंधीं मत, ह्यांचा राजकीय बळावर परिणाम होत असतो, हें जर्मनीनें नुकतेंच दाखवून दिलें आहे. हे सर्व असूनहि आणि त्यास आर्थिक व औद्योगिक शक्तींची जोड देऊनहि ह्या पुढें भागणार नाहीं; शास्त्रीय प्रगतीचाहि राजकीय शक्तीशीं फार घनिष्ट संबंध आहे, हें ताज्या महायुद्धानें सिद्ध केलें आहे.

शास्त्रीय संशोधनास राजकीय व लष्करी हालचालींनीं फार पुरातन काळापासून चालना दिलेली आहे आणि पूर्वीचे मोठे शास्त्रज्ञ हे मूलतः लष्करी तज्ञच होते, असें म्हणतां येईल. ई. एम. फ्रीडवाल्ड ह्यांनीं "डिसकव्हरी" ह्या ताज्या अंकांत एक लेख लिहून ह्या विषयावर उत्कृष्ट प्रकाश पाडला आहे. युरोपांतील औद्योगिक क्रांतीनंतर शास्त्रांची लष्करी पार्श्वभूमि कमी होऊन त्यास आर्थिक व सामाजिक महत्त्व प्राप्त झालें. शास्त्रीय संशोधनामुळें औद्योगिक प्रगति घडून आली आणि तिनें शास्त्रीय संशोधनास चालना दिली. अशा रीतीनें दोघांचेंहि पोषण होऊन औद्योगिक शक्ती ही राजकीय सत्तेचा पाया बनली आणि अप्रत्यक्ष रीतीनें शास्त्रीय प्रगतीवरच राजकीय सत्ता अवलंबून रहाण्याचा योग दिसूं लागला. ही गोष्ट जर्मनी खेरीज इतर देशांना नीटशी लवकर पटली नाहीं. त्या कारणानें, १९१४–१८ च्या महायुद्धाचे प्रारंभीं जर्मनीजवळ जितके शास्त्रज्ञ होते तितके दुसऱ्या कुणाजवळच नव्हते आणि बाकीच्या देशांना युद्ध चालू असतांनाच इकडे शास्त्रीय संशोधनाची व्यवस्था करावी लागली ! दुसऱ्या महायुद्धांत शास्त्रीय शोधांनीं फारच महत्त्वाचा भाग घेतला आहे. रेडिओ नियंत्रित रॉकेट, वैमानिकाचा अभाव असलेलें विमान, आवाजाच्या वेगानें जाणारें विमान, स्वतःच नेम धरणारे बाँब व टॉरपीडो, ॲटम बाँब, हीं सर्व शास्त्रीय शोधांनींच शक्य केलीं आणि त्यांचा युद्धावर प्रभावी परिणाम झाला आहे. शास्त्रीय प्रगती खेरीज कोणतेंच युद्ध आतां लढवतां येणार नाहीं, किंवा जिंकतां येणार नाहीं. शास्त्रीय संशोधनाची गति इतकी वाढली आहे कीं नव्यानें पुढें येणाऱ्या देशास स्पर्धेत स्थानहि मिळण्याची आशा नाहीं. ह्या दृष्टीनें पाहतां, हिंदुस्थानची आजची स्थिति समाधानकारक नाहीं, इतकेंच नव्हे तर ती आशादायकहि नाहीं, असें म्हणणें प्राप्त आहे.

शास्त्रीय शक्तीच्या जागतिक वांटणीचा विचार करतांना, ज्या शास्त्रांचा राजकीय प्रभुत्वाशी विशेष संबंध आहे, अशीच शास्त्रें लक्षांत घेतलीं पाहिजेत आणि तीं म्हणजे विज्ञान, रसायन, प्राणि आणि वैद्यक शास्त्रें होत. कोणत्याहि देशाची शास्त्रीय शक्ति मोजण्याचें सोपें साधन सांपडण्याजोगें नाहीं. तेव्हां, नोबेल प्राइज मिळविलेल्या शास्त्रज्ञांच्या संख्येवरून वेगवेगळ्या देशांची शास्त्रीय शक्ति अजमावतां येईल, असें सांगून फ्रीडवॉल्ट ह्यांनीं त्यासंबंधांत खालील तक्ता दिला आहे:—

### शास्त्रज्ञांची वर्गवारी

| | विज्ञान | रसायन | विज्ञान व रसायन | प्राणि व वैद्यक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| जर्मन | १२ | १७ | २९ | ९ | ३८ |
| ब्रिटिश | १० | ६ | १६ | ९ | २५ |
| अमेरिकन | ७ | ३ | १० | ७ | १७ |
| फ्रेंच | ७ | ६ | १३ | ४ | १७ |
| डच | ४ | २ | ६ | २ | ८ |
| ऑस्ट्रिअन | ३ | १ | ४ | ३ | ७ |
| स्वीड | २ | ३ | ५ | १ | ६ |
| डॅनिश | १ | — | १ | ४ | ५ |
| स्विस | — | ३ | ३ | १ | ४ |
| इटालिअन | २ | — | २ | १ | ३ |
| रशियन | — | — | — | २ | २ |
| कनेडिअन | — | — | — | २ | २ |
| बेल्जिअन | — | — | — | २ | २ |
| हंगेरिअन | — | १ | १ | १ | २ |
| फिन | — | १ | १ | — | १ |
| स्पॅनिअर्ड | — | — | — | १ | १ |
| हिंदी | १ | — | १ | — | — |
| | ४९ | ४३ | ९२ | ४९ | १४१ |

पश्चिम गोलार्धांतील शास्त्रज्ञांनींच शास्त्रीय संशोधनांत महत्त्वाची भर घातली आहे आणि त्यांतहि पश्चिम युरोपांतील शास्त्रज्ञांनी चार पंचमांश नोबेल बक्षीसें मिळविलीं आहेत. अमेरिकेचें नांव ह्या यादींत त्या मानानें खालीं आहे आणि रशियाचें नांव तर फारच खालीं असलेलें आढळतें. तथापि, अमेरिकेंतील संशोधन आतां जोमानें चालू आहे आणि रशिया संशोधन क्षेत्रांत नव्यानेंच दाखल झाला असला तरी तो लवकरच आघाडीवर येण्याचा रंग दिसतो. हिटलरचा उदय होईपर्यंत, जर्मनीकडे शास्त्रीय बाबतींत जगाचें नेतृत्व होतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. ग्रेट ब्रिटन किंवा फ्रान्स ह्यांचे मागून शास्त्रीय क्षेत्रांत प्रवेश करूनहि जर्मनीनें पुढारीपण मिळविलें होतें. १९१८ ते १९३३ ह्या मुदतींत जर्मनीनें १५ नोबेल बक्षिसें मिळवलीं, त्याच काळांत ब्रिटनच्या वांट्यास फक्त ६ व अमेरिकेच्या वांट्यास फक्त ३ बक्षिसें आलीं. १९३४ पासून हिटलरच्या अमदानींत जर्मन शास्त्रज्ञांस वाव कमी उरला आणि त्याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. अमेरिकेनें शास्त्रीय संशोधनाकडे कसून लक्ष पुरविण्यास प्रारंभ केला आणि त्यामुळें आज त्या देशाच्या शास्त्रज्ञांस पुढारीपण प्राप्त झालें आहे. रशिया आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या मानानें कोणत्याहि देशापेक्षां ज्यास्त रकम संशोधनावर खर्च करतो आणि शास्त्रीय शिक्षणास प्राधान्य देतो. त्याचा परिणाम लवकरच दिसून आल्या-

विना रहाणार नाहीं. स्वातंत्र्याप्रत पोचलेल्या हिंदुस्थानानें आपलें सामर्थ्य वाढविण्यासाठीं कोणत्या मार्गानें गेलें पाहिजे, हा मार्ग किती अवघड, चढीचा व कालहारी आहे हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. हिंदुस्थानांत प्रथम शांतता नांदल्याखेरीज शास्त्रीय संशोधनाची योजनात्मक आखणी करतां येणें कठीण आहे हें उघड आहे. तथापि, शास्त्रांच्या अभ्यासाचें महत्त्व आपल्या लोकांस पटविण्याचें प्राथमिक कार्य त्यासाठी थांबून रहाण्याचें कारण नाहीं.

# शेती–सुधारणेची अर्थव्यवस्था

हिंदुस्थानांतील शेतीचें दर एकरीं उत्पादन पुढारलेल्या देशांच्या मानानें अत्यल्प आहे हें प्रसिद्धच आहे. वास्तविक ही गोष्ट युद्धपूर्व कालांतहि हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं अनेकदां उघडपणें सांगितली असतांना तिच्या गंभीर अर्थाकडे मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं कानाडोळा केला. युद्धकालांत देशांत अनेक कारणांमुळे अन्नधान्याची टंचाई पडूं लागली तेव्हांच हा प्रश्न निदान चौकशी करण्याच्या योग्यतेचा आहे असें मध्यवर्ती सरकारला वाटून सप्टेंबर १९४४ मध्यें या प्रश्नासंबंधीं एक कमिटी नेमण्यांत आली. या कमिटीचे अध्यक्ष महाराष्ट्रांतील व हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रो. डी. आर. गाडगीळ यांना नेमण्यांत आलें होतें. अध्यक्षांच्या मार्गदर्शकत्वाखालीं कमिटीनें जो अहवाल तयार केला आहे तो तत्त्व आणि व्यवहार अशा दोन्ही दृष्टींनीं अत्यंत उपयुक्त असाच आहे. शेतीच्या व्यवसायाला योग्य अशी अर्थव्यवस्था कशी उभारावी यासंबंधीं शिफारशी करण्याचें काम मुख्यतः कमिटीकडे सोपविण्यांत आलेलें होतें. अहवालाचीं एकंदर १० प्रकरणें असून व्यावहारिक शिफारशींच्या दृष्टीनें चार, पांच आणि सहा हीं प्रकरणें महत्त्वाचीं आहेत. बाकीच्या प्रकरणांपैकीं पहिल्या दोन विषयांची पार्श्वभूमि समजावून सांगणारीं असून या विषयाच्या अभ्यासकांना त्यांत नवीन कांहीं सांपडणार नाहीं. तथापि शेती आणि अर्थशास्त्र यांचे परस्पर संबंध किती निगडित आहेत हें समजण्यासाठीं आणि हिंदी शेतीपुढें आज उभे असलेले प्रश्न भूतकाळांतून कसे निर्माण झाले आहेत याचा उलगडा करून घेण्यासाठी या प्रकरणांची आवश्यकता होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. सात, आठ व नऊ हीं प्रकरणें अनुक्रमें खाजगी सावकारीसारख्या व्यवहाराचें नियंत्रण, जमीन कसणाराची शाश्वतता व पत आणि मदत व पुनर्घटना यासंबंधींचा विचार करणारी आहेत. अहवालाच्या मुख्य विषयाच्या अनुषंगानें उत्पन्न होणाऱ्या महत्त्वाच्या बाबींचा या प्रकरणांतून विचार केलेला आहे.

हिंदी शेतीच्या व्यवसायाची भरभराट होण्यासाठीं प्रथमतः त्या व्यवसायांत गुंतलेल्या लोकांची कर्जाच्या कचाट्यांतून मुक्तता झाली पाहिजे ही महत्त्वाची बाब गृहीत धरूनच नव्यानें उभारावयाच्या शेतीसहाय्यक अर्थव्यवस्थेचा विचार करण्यांत आलेला आहे. अहवालाच्या ४ थ्या प्रकरणांत या कर्जमुक्तीची तपशीलवार चर्चा करण्यांत आलेली असून चर्चेत सुस्पष्ट करण्यांत आलेलीं तत्त्वें व्यवहारांत आणलीं गेलीं तर हा प्रश्न सुटण्याच्या मार्गाला लागेल यांत शंका नाहीं. शेतकरी लोकांच्या कर्जात खाजगी सावकारीचा बराच भाग असतो. खेडेगांवांतील आजची परिस्थिति लक्षांत घेतां ही सावकारी पूर्णपणें नाहींशी करतां येणार नाहीं ही गोष्ट अहवालांत नमूद करण्यांत आली असून त्यावरून वस्तुस्थिति नीट पाहून शिफारशी करण्यांत आलेल्या आहेत हें सिद्ध होतें. पण खाजगी सावकारीवर कडक नियंत्रण घातलें गेलें पाहिजे व तें अंमलांत आणलें पाहिजे असाही इषारा देण्यांत आलेला आहे. शेतकरी आणि त्यांचा धनको यांच्यांत कर्जासंबंधीं तडजोड करणाऱ्या संस्थेनें हिशेब काळजीपूर्वक तपासावे अशी सूचना करण्यांत आलेली आहे. निरक्षर व अडाणी शेतकऱ्यास फसविण्याचे जे प्रकार खेडोपाडीं नेहमीं दिसून येतात, त्यांचीच दखलगिरी या सूचनेंत घेण्यांत आली आहे. केवळ कायद्याच्या कलमांत बसूं शकणारे असे हिशेब ठेवून सावकाराला शेतकऱ्याला नाडतां येतें, तसें झालें असेल तर हिशेबाच्या पोटीं झालेला व्यवहारच तडजोड करणाऱ्या संस्थेनें विचारांत घेणें इष्ट आहे, यांत कांहीं शंका नाहीं.

सध्यां खेडोपाडीं शेतीचें अर्थशास्त्र खाजगी सावकारांच्या हातीं असलें तरी त्यांच्यावर नियंत्रण घातल्यावर, शेतकऱ्यांना पतीवर कर्जे मिळण्याची व्यवस्था होणें अवश्यच आहे. ज्या शेतकऱ्यांची पत बऱ्यापैकीं असेल त्यांना योग्य अटीवर कर्जे देण्यासाठी मध्यवर्ती सरकारनेंच एक संस्था काढावी; या संस्थेवर अर्थातच सरकारचें नियंत्रण रहावें; आणि संस्थेच्या शाखा निरनिराळ्या प्रांतांतून असाव्या अशी सूचना करण्यांत आलेली आहे. अॅग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशन हें नांव या मध्यवर्ती संस्थेला देण्यांत आलेलें आहे. या संस्थेशिवाय शेतीच्या मालाला बाजारपेठ सुलभ करून देण्यासाठी बँकांचें व सहकारी संस्थांचें साह्य होण्यासारखें आहे. सरकारनें वहातुकीची सोय वाढविण्यासाठी निरनिराळ्या केंद्रांच्या ठिकाणीं मालासाठीं गुदामें बांधावीं, गुदामांत ठेवलेल्या मालाच्या दाखल्यावर व्यवहार करतां यावा म्हणून रिझर्व्ह बँकेच्या सूचनांप्रमाणें कायदा होण्याची आवश्यकता प्रतिपादन करण्यांत आलेली आहे.

शेतींत उत्पादकाची (श्रम करणाऱ्याची) कर्ज–मुक्तता झाल्याखेरीज आणि त्याच्या जीवनांत किमान सुखसोय निर्माण झाल्याखेरीज शेतीचें शास्त्रशुद्ध अर्थशास्त्र निर्माण होणार नाहीं ही गोष्ट अहवालांत कटाक्षानें सांगण्यांत आलेली आहे. जुन्या धनकोंच्या कर्जाबाबत तडजोड झाल्यावर त्या सर्वांचीं कर्जे सहकारी लँड मॉर्टगेज बँकांनीं अगर सरकारनें निर्माण केलेल्या एकाद्या संस्थेनें अंगावर घ्यावीं व देऊन टाकावीं असें सुचविण्यांत आलें आहे. शेतकऱ्यांच्या कर्जासंबंधीं विचार करतांना १९३० सालापासून १९३८–३९ पर्यंत आलेल्या मंदीचा त्याचप्रमाणें युद्धकालांतील तेजीचाही परामर्श घेण्यांत आलेला आहे. युद्धकाळांतील शेतीच्या मालाच्या किंमतींची तेजी लक्षांत घेऊन सुद्धां सर्वसामान्य शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाचा भार जबर आहे असाच निष्कर्ष कमिटीनें काढला आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनेंतील एक महत्त्वाचा भाग म्हणूनच कमिटीनें शेती सहायक अर्थशास्त्राकडे पाहिलें असून त्या धोरणानेंच शिफारसी केलेल्या आहेत. त्यांपैकीं काहींचा मात्र निर्देश करणें जरूर आहे. शेतीच्या प्रत्येक विभागांतून शेती व उद्योगधंदे यांच्यांत समतोलपणा असावा, शेतजमिनीचे तुकडे ते करण्यास परवडावे इतके मोठे असावे, जमीन कसणाऱ्यास शाश्वती वाटली पाहिजे, पाणीपुरवठ्याची व्यवस्था करून उत्पादनाला असणारा जलाभावाचा धोका नाहींसा केला पाहिजे, शेतकऱ्यांची कार्यकुशलता वाढविली पाहिजे, शेतीच्या मालाच्या किंमती किमान नफा देतील अशा ठरविल्या पाहिजेत, इत्यादि अनेक उपयुक्त सूचना अहवालांत करण्यांत आलेल्या आहेत. नित्याप्रमाणेंच दुष्काळासारख्या नैमित्तिक प्रसंगीं सरकारनें काय धोरणानें व कोणत्या प्रकारची योजना करावी याबद्दलही दिग्दर्शन करण्यांत आलेलें आहे. एकंदरीनें अहवाल तात्त्विक व व्यावहारिक दृष्टीनें उपयुक्त झालेला असून अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना अभ्यासपद्धतीची दिशा दाखविणाराही आहे.

**ब्रिटिश बँकांनीं दिलेलीं कर्जें**—ब्रिटिश बँकांनी दिलेल्या कर्जाची छाननी केली, तर ऑगस्टच्या १९४६ मध्यें व्यक्तिशः व व्यवसायात्मक कर्जाचें एकूण कर्जाशीं प्रमाण २९.५ पडलें असें आढळून येतें. मोठाले कारखाने ज्यास्त ज्यास्त प्रमाणांत बँकांकडून कर्जे घेत आहेत. तथापि, व्यापार व कारखानदारी ह्यासाठी बँकांनीं दिलेल्या कर्जाचा आंकडा ( ९१ कोटि पौंडांत ६४ कोटि पौंड ) जरा लहानच दिसतो. ह्याचें कारण बँकांजवळील पैसे वाढले आहेत, लोकांची बँकांच्या कर्जाची गरज कमी झाली आहे व मालाच्या तुटवड्यामुळें कारखान्यांची वाढ अपेक्षेप्रमाणें होत नाहीं.

## स्फुट विचार

### रुपयाची सम ( ' पार ' ) किंमत

रुपयाच्या सम ( ' पार ' ) किंमतींत बदल न करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. इंटर नॅशनल मोनेटरी फंडाच्या नियमाप्रमाणें, हिंदी रुपयाची सोन्यांतील किंवा अमेरिकन डॉलर मधील ता. २८ ऑक्टोबर १९४५ रोजींची सम किंमत हिंदुस्थान सरकारनें फंडास कळविणेंची होती. त्याप्रमाणें १ रु. = १ शि. ६ पेन्स; १ पौंड = ४·०३ डॉलर्स आणि १ औंस सोनें = ३५ डॉलर्स ह्या हिशेबानें रुपया = २·००८६३५७ औंस सोनें ही रुपयाची किंमत ता. १२ ऑक्टोबर १९४६ रोजीं कळविण्यांत आली. ही किंमत समाधानकारक नाहीं असें हिंदुस्थान सरकारनें १२ डिसेंबर १९४६ पूर्वी इं. मोनेटरी फंडास कळविलें किंवा ही किंमत टिकण्याजोगी नाहीं असें फंडानें हिंदुस्थानास कळविलें, तर हिंदुस्थानानें फंडाशीं सहमत तरी झालें पाहिजे किंवा फंडाच्या संघटनेंतून बाहेर तरी पडलें पाहिजे, असें त्या संघटनेच्या नियमांत सांगितलेलें आहे. हिंदुस्थान सरकारनें ह्या प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार केला. रिझर्व्ह बँकेचा सल्ला तिनें घेतला, आणि हितसंबंधी व तज्ज्ञ लोकांकडून सूचनाहि मागविल्या. त्या सर्वांचा विचार करतां, रुपयाची ता. २८ ऑक्टोबर १९४५ रोजींची किंमत हीच आजहि सम ' पार ' किंमत समजण्यास हरकत नाहीं, असें सरकारचें मत झालें. पूर्वी ही किंमत औंस सोन्यांत व्यक्त केली होती त्या ऐवजीं ती ग्रेन्स ट्रॉय सोन्यांत व्यक्त करण्यांत यावी, असें हिंदुस्थान सरकारनें इं. मी. फंडास कळविलें आहे. रुपयांत ४·१४५१४२८५७ ग्रेन सोनें आहे असें तात्त्विक दृष्ट्या गृहीत धरलें तर १ अमेरिकन डॉलर = ३·३०८५१९४ रुपये अशी हुंडणावळ होते.

---

### चहाच्या प्रसारासाठी प्रचार योजना

युद्धाच्या धामधुमींत शत्रूशीं लढत दोस्तांचे सैनिक रानोमाळ हिंडत होते तेव्हां त्यांची व दोस्त राष्ट्रांतील कामगार औद्योगिक केंद्रामध्यें युद्ध साहित्याचा पुरवठा करण्यासाठी कष्ट करीत होते तेव्हां त्यांची, तरतरी व कार्यक्षमता कायम राखण्यास चहाच्या कपानें फार मोठी मदत केली आहे. त्या काळांत चहाचा प्रसार वाढविण्याकडे लक्ष द्यावयास कोणास फुरसत नव्हती. परंतु आतां युद्ध संपल्यामुळें या कामाकडे पुनः सर्व चहावाल्यांचें लक्ष गेलें आहे. चहाच्या प्रचाराचें काम पूर्वीपासून करीत असलेल्या इंडियन टी मार्केट एक्सपानशन बोर्डानें आतां एक लांबलचक कार्यक्रम ठरवला आहे. या संस्थेच्या आसाम शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा तेजपूर येथें नुकीच मि. डब्ल्यू. एच्. माइल्स, कमिशनर फॉर इंडिया, यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती; तेव्हां त्यांनीं चहाच्या प्रचाराची योजना विषद करून सांगितली. मूळ योजनेप्रमाणें प्रत्येक लहान सहान खेड्यापर्यंत चहाचें प्रचारकार्य जावयाचें आहे. परंतु तूर्त सुमारे दहा हजार लोकवस्तीचीं सर्व गांवें प्रचारकांनीं व्यापावयाचीं असून जेथें चहाचा प्रवेश झालेला नाहीं तेथें तो व्हावा व जेथें चहा हें केवळ चैनीचें पेय समजलें जातें तेथें त्याचा उपयोग नित्याच्या जीवनांत व्हावा, अशी खटपट हे प्रचारक करणार आहेत. प्रचाराचें दुसरें अंग म्हणजे औद्योगिक केंद्रांतून उपहारगृहें उघडावयाचीं. १९४६ च्या मध्यापर्यंत अशीं ४१६ उपहारगृहें बोर्डाच्या उत्तेजनानें निघालीं आहेत. युद्ध काळांत कामगारांकडून जादा तास काम करून घेण्याची जेव्हां जरूरी होती तेव्हां कामगारांचा उत्साह टिकविण्यासाठीं त्यांना हें उत्तेजक पेय मिळण्याची सोय कारखानदार मालकांनीं आस्थेनें केली. मध्यवर्ती सरकारनेंहि आतां ५० पेक्षां अधिक कामगार कामावर लावणाऱ्या कारखान्याकडून जवळपास उपाहारगृहाची सोय केली जावी असें बिल मंजूर करावयाचें ठरविलें असल्यामुळें चहाच्या प्रसाराला नवें क्षेत्र मिळणार आहे. हिंदुस्थानांतील उपाहारगृहांतून पाश्चात्य पद्धति कोठपर्यंत आचरावी व पाश्चात्य पद्धतीवरील उपहारगृहांची व्यवस्था ठेवण्याचें शिक्षण कसें द्यावें एतद्विषयक सूचना करण्यासाठी इंटरनॅशनल टी मार्केट एक्सपॅनशन बोर्डाकडून दोन तज्ज्ञहि हिंदुस्थानमध्यें येणार असून सर्व देशभर फिरून पहाणी व सल्लामसलत देण्याचें काम करणार आहेत.

---

### मृत्यू : अपघाती का आमंत्रित !

एक विमेदार गृहस्थ एका दुकानचा ग्राहक होता. एक दिवस त्याच दुकानाच्या दुसऱ्या एका ग्राहकाशीं त्याचा वाद लागला. वादानें प्रश्न मिटेना तेव्हां विमेदारानें त्या दुसऱ्या गृहस्थास दुकानाबाहेर येऊन मारामारीस आव्हान दिलें. तो बाहेर येतांच विमेदारानें ठोसा लगवण्यासाठीं हात वर उगारून त्याजवर झाप घातली परंतु त्याचा नेम चुकला. त्या दुसऱ्या ग्राहकाचा नेम मात्र बरोबर साधला, नि त्याच्या ठोशानें विमेदार पडला आणि त्याचें डोकें शेजारच्या फरसबंद पायरस्त्यावर आपटलें व तो कांहीं तासांनंतर मेला. त्याच्या विमा करारांत केवळ अपघातानें मृत्यू आला तर त्याची जोखीम कंपनीकडे होती. परंतु कंपनीचें म्हणणें पडलें कीं मारामारीचें आव्हान विमेदारानें आपण होऊन दिलें होतें तेव्हां आमंत्रण दिलेल्या मारामारींत त्याला आलेला मृत्यू अपघाती कसा म्हणतां येईल ? कॅलेफोर्नियाच्या डिस्टिक्ट कोर्टानें निकाल दिला कीं विमेदारानें मारामारीला आव्हान दिलें होतें परंतु मारामारींत गुद्दा खाऊन आपण मरूं अशी त्याची कल्पना नव्हती. शिवाय गुद्यानें विमेदार मेलेलाच नाहीं. गुद्दे खाऊन तो पडला नि फरशीवर त्याचें डोकें आपटलें म्हणून तो मेला. पडल्यामुळें डोकें फुटून मरण्यापर्यंत पाळी येईल अशी कोणाचीच कल्पना नव्हती म्हणून विमेदाराचें मरण अपघातानेंच ओढवलें आहे व कंपनी विमेदारास जबाबदार आहे.

---


**THE BRIHAN MAHARASHTRA SUGAR SYNDICATE LTD., POONA 2.**

# NOTICE.

The Twelfth Annual General Meeting of the Share-holders of the Brihan Maharashtra Sugar Syndicate Ltd., Poona 2, will be held on Tuesday, the 31st December 1946 at 3 P. M. at the Tilak Smarak Mandir, Poona 2, to transact the following business :—

(1) To receive and adopt the Directors' Report and Audited Statements of Accounts for the year ended 30th September 1946.

(2) To sanction the payment of a Dividend for the above-mentioned period.

(3) To elect Directors in place of those who retire but are eligible for re-election.

(4) To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

By Order of the Board of Directors,

Poona 2, 9th December 1946. — C. G. AGASHE & Co., *Managing Agents.*

*Note* :—The Transfer Books of the Company will be closed from 18th of December 1946 to 7th of January 1947 ( both days inclusive ).

The Dividend when declared will be made payable at the Bank of Maharashtra Ltd., Poona, on and after the 7th of February 1947.

# महाराष्ट्रीय कंपन्या

( श्री. व. वि. लोणकर एम्. ए., बी. कॉम्. )

ज्यांना पैसे गुंतविणें आहे व ज्यांनीं पूर्वी महाराष्ट्रीय कंपन्यांत पैसे गुंतविले आहेत अशांच्या दृष्टीनें महाराष्ट्रीय कंपन्यांच्या शेअर्सच्या बाजाराचा अभाव हें महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीतील मोठेंच वैगुण्य आहे. पुण्यामध्यें अधिकृत शेअरबाजार निघेल तेव्हां निघो, तोपर्यंत महाराष्ट्रीय कंपन्यांची माहिती एकत्र करून त्यांना गुंतविणाऱ्यापुढें आणावें या दृष्टीनें महाराष्ट्रीय कंपन्यांतील गुंतविणाराला लागणारी माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला आहे. आम्हीं याबाबत बहुतेक प्रसिद्ध महाराष्ट्रीय कंपन्यांशीं पत्रव्यवहार केला, आणि त्यांची कांहींजणाकडून आपुलकीच्या भावनेनें सविस्तर उत्तरेंहि आलीं. पण त्याबरोबरच खेदाची गोष्ट अशी कीं, कांहीं नामांकित म्हटल्या जाणाऱ्या कंपन्याकडून कोठल्याहि प्रकारचा सहकार केला गेला नाहीं. तेव्हां ज्यांच्याकडून माहिती आली त्यांच्या एकत्रित माहितीचा तक्ता खालीं देत आहों.

महाराष्ट्राच्या एकंदर प्रगतीचा आढावा घेण्याच्या दृष्टीनें खालील तक्ता अपुरा आहे. पण धंद्याच्या वर्गवारीनें महाराष्ट्रानें ज्या व्यवसायामध्यें प्रगती केली आहे ते व्यवसाय मुख्यतः साखर, सूत व कापड, कांचसामान, कच्चें रेशीम, यंत्रसामग्री, वहातूक, विमा आणि बँकिंग ह्यामध्यें अंतर्भूत झालेले दिसतील. वसूल भांडवलाच्या दृष्टीनें पहातांना दहा लाखापर्यंत भांडवल असलेल्या कंपन्या हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या असून बहुतेकांचें भांडवल लाख दोन लाखांतच सांपडतें. बहुतेक ठिकाणीं ठेवी स्वीकारण्यावरतीच कंपन्यांना जोर द्यावा लागतो असें दिसतें. ह्या दृष्टीनें कमी भांडवल, अधिक ठेवी आणि बेतास बात गंगाजळी अशी साधारण परिस्थिति दिसत असून ताळेबंदी मजबुती वाढण्यात बराच वाव आहे. कांहीं नामांकित महाराष्ट्रीय कंपन्यांची परिस्थिति चांगली असूनहि त्यांच्याकडून माहिती आली नाहीं. कंपन्यांचे शेअर्स शेअरबाजाराचे अभावीं चटकन घेणें अथवा विकणें फार मुष्किलीचें झालें आहे. महाराष्ट्रांतला ब्रोकर्सचा वर्ग तसेंच शेअर्सकडे लक्ष असणारी मंडळी यांचें लक्ष मुंबईसारख्या सट्टेबाजाराकडे अलिकडे जास्त लागत चाललें आहे. ही सट्ट्याची प्रवृत्ती महाराष्ट्रांतला खेळता पैसा गडप करीत चालली आहे. तेव्हां महाराष्ट्रीय गुंतविणाऱ्यांनीं या प्रवृत्तीला तावडतोब पायबंद घालणें जरूर आहे. त्याचबरोबर ज्या होतकरू महाराष्ट्रीय कंपन्यांना अधिक भांडवलाची जरूर आहे त्यांच्याकडे आपल्या पैशाचा ओघ भांडवल विकत घेऊन अथवा ठेवी ठेऊन वळविला पाहिजे.

ज्या कंपन्यांनीं माहिती पाठवून सहकार्य केलें त्यांचे आम्ही आभारी आहोंत. तसेंच वरील माहिती संकलित करतांना श्री. ब. कुलकर्णी यांनीं बरीच मदत केली याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

| कंपनीचें नांव, मुख्य कचेरी, स्थापना व मॅनेजिंग सेक्रेटरी किंवा मॅनेजिंग डायरेक्टर | धंद्याचें स्वरूप | हिशेबाची वर्षअखेरी व डिव्हिडंड केव्हां देतात | ट्रान्स्फर फी | अधिकृत व खपलेलें भांडवल | वसूल भांडवल | दर्शनी किंमत आर्डिनरी | दर्शनी किंमत प्रेफरन्स | गंगाजळी | ब्लॉक | घसारा फंड | शेअरची वसूल रक्कम | बाजारी किंमत | दिलेलें डिव्हिडंड | ताळेबंदाची बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) जी. जी. दांडेकर, मशिन वर्क्स, भिवंडी, जि. ठाणें (१९३८) श्री. दांडेकर इंजीनिअर्स | दळण–कांडणाचीं यंत्रें | जूनमध्यें वर्षअखेरी व डिसेंबरमध्यें डिव्हिडंड देतात | शेअरला आठ आणे | अधिकृत : ५ लक्ष खपलेलें : ४,९८,९७५ | [illegible] | १०० | १०० | ६५,०७० | २,१८,३३५ | | १०० | | | १,६४,८४५–१२–९ |
| (२) ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड पो. ओगलेवाडी, जि. सातारा (१९१९) श्री. एस. पी. ओगले आणि कं. | कांच सामान | जून, डिसेंबर | शेअरला चार आणे जास्तींत जास्त २–८–० | अधिकृत : १०,००,००० खपलेलें : ८,००,००० | १०,००,००० | २५ | | २,४७,८४५ घसारावजा | ११,९०,४७७ | नाहीं | २५ | ४० ते ४५ | १९४३, १९४४, १९४५ १६% दर वर्षी | २७,७८,८०४।६।३ |
| (३) सासवड माळी शुगर फॅक्टरी लि० १६, अपोलो–स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १ (१९३२) श्री. एच. बी. गिरमे | साखर | जुलै, फेब्रुवारी | शेअरला चार आणे जास्तींत जास्त १० रुपये | अधिकृत : ८ लक्ष | ११,८३,१०० | १०० | १०० | | | ५,२२,३६३ | १०० | | १९४३–४४ ६% १९४४–४५ ६% | |
| (४) जयशंकर मिल्स बार्शी लि. बार्शी, जि. सोलापूर (१९२२) झाडबुके आणि कं. | सूत | सप्टेंबर, फेब्रुवारी | शेअरला चार आणे | अधिकृत : २०,००,००० खपलेलें : ९,८६,५०० | ११,८७,२०० | १०० | नाहीं | १०,५०१ | १३,९२,१०८ | ५,४६,२०० | १०० | १०० | १९४३–८% १९४४, १९४५ ४% | ३०,४७,४६२ |
| (५) लोकमान्य मिल्स बार्शी लि. आरणगांव रोड, बार्शी (१९२२) श्री. बी. पी. झुलाखे | सूत व कापड | डिसेंबर, ऑगस्ट | शेअरला एक रुपया | अधिकृत : ३०,००,००० १२५ रुपयाचे २४००० शेअर्स | ११,२४,१०० | १२५ | नाहीं | १०,००० घसारावजा | | ४,९५,९८४ | १२५ रुपयाचे ७७४८ शेअर्स ६५ रुपयास | ९५ ते १०० | १९४३–१०% करासह १९४४–४५ ५% करमाफ | |
| (६) दी बॉंबे सिल्क फिलेचर्स लि० २१, ठळकवाडी, बेळगांव (१९४५) श्री. एम. जी. नाईक | कच्चें रेशीम | जून | दर ट्रॅन्स्फर फॉर्मला चार आणे | अधिकृत : २०,००,००० खपलेलें : १०,००,००० | ३,९८,००० | १० | | | ३६,३२३ | | ४० | | | ४,०३,५५० |
| (७) लॉंगलाईफ इन्शुअरन्स कंपनी लि. १८०, बुधवार पेठ, पुणें २ (१९३३) श्री. एस. एल. आपटे | आयुर्विमा | डिसेंबर, डिसेंबर | शेअरला चार आणे | अधिकृत : १०,००,००० खपलेलें : ३,१४,३०० | २,१२,७०० | १०० | | २,८५५ | ८७,३९८ | | ८० | ८० | करासह १९३७–५% १९४२–५% | ८,६१,६८४ |
| (८) सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि. सोलापूर (१९१८) श्री. एस. व्ही. अभ्यंकर | बँक | जून, जून | ,, | अधिकृत : ३,००,००० खपलेलें : १,३८,१०० | १,३४,००० | ५० | | १,५७,१५८ | | इमारत ३०,००० सेक्युरिटी ७७८० | ५० | | १९४३–४% १९४४–५% १९४५–४% | ३६,५०,४९४ |
| (९) न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. १६, अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १ (१९३७) श्री. डी. डी. देशपांडे | बँक | मार्च, ऑगस्ट | पहिल्या ३ शेअर्सना १ रुपया आणि नंतरच्या प्रत्येक शेअरला ८ आणे, जास्तींत जास्त ७ रुपये | अधिकृत : ३०,००,००० खपलेलें : १६,०९,४०० | १०,४१,९०० | २५ | ५० | ७६,००० | | | १२–८–० | | ५% करासह | २,९०,३४,००० |
| (१०) कॉसमॉस को. ऑ. अर्बन बँक लि., लक्ष्मीरोड, पुणें २ (१९०६) श्री. एस. बी. आपटे | ,, | जून, नोव्हेंबर | दर शेअरला चार आणे | अधिकृत : ९३,२४० खपलेलें : १,२५,००० | ९१,२४० | २० | | ५७,१६७ | | | २० | | करमाफ १९४२, १९४३ ३ 3/4 १९४३-४४ २ 1/2% १९४४-४५, ४६ ३ 3/4 | १,२२,७४८ |
| (११) नाणेघाट फ्युनिक्युलर ट्रामवे अँड ट्रान्सपोर्ट कंपनी लि. ३८, डेक्कन जिमखाना, पुणें ४ (१९४५) डेक्कन इंजिनिअर्स लि. | नाणेघाटांतील वहातूक | | ऑर्डि. व डिफ. दर शेअरला ४ आणे, जास्तींत जास्त १० रुपये | अधिकृत : २५,००,००० खपलेलें : ९,७०,००० | २,५१,७९५ | १०० | डिफर्ड २५ | | १८,००७ | | २५ १० डिफर्ड | | | २,७३,७५४ |

टीपः—मुंबई प्रांतांत शेअरला एक रुपया दोन आणे स्टँप पडतो.

# युद्धपूर्व व युद्धकालीन जपान

लेखकः—श्री. विनायक श्रीधर सुपनेकर

जपान अशियांतच नव्हें, तर सर्व जगांत इतक्या थोड्या अवधींत पुढें आला ही केवळ दैवाची गोष्ट नाहीं. स्वतःच्या गुणामुळें तो वर आलेला आहे. राष्ट्रीय गुणांचा पुण्यसंचय त्याचे मागें आहे. दैववादावर त्याचा विश्वास नसून कर्मवादाचा तो पुरस्कर्ता होता.

**क्रांतींतून निर्माण झालेला जपान :**— जगाच्या राष्ट्रमालिकेंत एक सामान्य राष्ट्र म्हणून जपानचा दर्जा होता. अवघ्या तीस-चाळीस वर्षांच्या उद्योगानंतर पहिल्या प्रतीच्या राष्ट्रांत त्याची गणना होऊं लागली.

मोइजी युगांत जी क्रांति घडून आली ती मुख्यतः मानसिक स्वरूपाची होती. जपानला प्रत्येक बाबतींत पाश्चात्य लोकांबरोबर आलें पाहिजे हें एक सूत्र हृदयापाशीं बाळगून मोइजी व त्यांचे सहकारी यांनीं जपानच्या सर्व जीवनांत आमूलाग्र सुधारणा करण्यास आरंभ केला. ही वृत्ति केवळ राजकीय आणि औद्योगिक क्षेत्रांतच झाली आहे असें नव्हे तर खेळ, करमणुकी, कला इत्यादि क्षेत्रांतही ती आढळून येते.

**जपानी धार्मिक परंपरा आणि तिचा राष्ट्रसंवर्धनाचे कामीं उपयोगः**—जपानच्या अडीच हजार वर्षांच्या इतिहासामध्यें विशिष्ट परंपरा आणि श्रद्धा दृढमूल झाल्या असून त्यांचे अवशेष समाजामध्यें आजही आहेत. सुदैवानें त्याचा उपयोग जपानला राष्ट्रसंवर्धनाचे कामीं झाला.

जपानचें राष्ट्र हें मोठें कुटुंब असून राजा हा या कुटुंबाचा जनक समजला जातो. येथें राजा म्हणजे देश आणि देश म्हणजे राजा असें समीकरण आहे व चीनमधून आलेल्या कन्फ्यूशियन नीतिधर्मातील राजनिष्ठा व पितृनिष्ठा हीं दोन तत्त्वें जपानच्या राज्यसंस्थेला पोषकच ठरलीं. पाश्चात्यांचा हल्ला जपानवर झाला त्यावेळीं ही राज्यसंस्था जपानचे उपयोगी पडली.


दुसरी परंपरा म्हणजे 'पितृपूजा ( शिंतो )' ही होय. आद्य-पूर्वजापासून आजतागायत जे पितर झाले ते सर्व देव, त्यांपैकीं प्रमुख अशा वीरांच्या, विभूतींच्या आणि राजांच्या समाधी देशांत ठिकठिकाणीं विखुरल्या आहेत. राष्ट्रीय स्मारकें म्हणून या समाधी-स्थानांची सरकारकडून काळजी घेतली जात असे. पूर्वापार चालत आलेल्या पूर्वजांच्या या समाधी देशांत अधुनिक जपानला सामर्थ्य आणि एक जीव देण्याचें दृष्टीनें फक्त उपयोगी पडल्या.

**व्यापार व मालकी हक्कः**—शंभर वर्षांपूर्वी जपानची लोकसंख्या मर्यादित होती. औद्योगिक प्रगति कांहींच झाली नव्हती. पण नंतर शेतीवर लोकांचा निर्वाह चालेना, म्हणून उद्योगधंद्याला आरंभ केली. उद्देश असा कीं शेतावर ज्याचें पोट भरत नाहीं त्यांना कारखान्यांत काम मिळावें; उद्योगधंद्यांचे मागोमाग कच्चा माल व बाजारपेठा यांचे प्रश्न आले. याबाबत जपान परतंत्र पडला. सर्व कच्चा माल पिकविणारे प्रदेश व बाजारपेठा गोर्‍या साम्राज्याच्या हातांत होत्या. आणि त्या आपल्या झाल्याशिवाय खरें औद्योगिक स्वावलंबन नाहीं असें जपानला वाटलें. जपानी मालानें अमेरिका व युरोप यांच्या बाजारी पेठांतही यशस्वी स्पर्धा केली. तेव्हां गोर्‍यांनीं त्यांच्या मालावर जबर कर लादले आणि यामुळेंच बाजारपेठा आपल्या हुकमती-खालीं पाहिजेत ही भावना निर्माण झाली.

**व्यापारामधील यशस्वी प्रगतिः**—यांत्रिक व शास्त्रीय सुधा-


शेअर्स विकणें आहेत:—
गोवर्धन डेअरी फार्म्स लि.,
गोवर्धनवाडी, पुणें १.

बडोदें सरकारच्या आश्रयानें संस्थापित
दि बडोदा बॅटरीज् लिमिटेड.
गोया गेट, बडोदा
★ ऑर्डिनरी शेअर्स रु. २० चे प्रत्येकीं पेडअप रु. १०. क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स, ५½ टक्के व्याजाचे, प्रत्येकीं रु. ५० चे पेडअप रु. २५.
★ १,२,३ व ४ वर्षे मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येत आहेत.
★ सुप्रसिद्ध "तेज" बॅटरीज तयार करणारा राष्ट्रीय उद्योगधंदा.
मॅनेजिंग एजंटस :
पानसे आणि कंपनी,
गोया गेट, बडोदा.
किंवा, सरदार पानसेवाडा, शुक्रवार पेठ, पुणें.
या पैकीं कोणत्याहि ठिकाणीं माहिती पत्रकें व अर्जाचे फॉर्म्स इत्यादि मिळतील.




चीफ एजंट:—
न्यू दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.












रणा, व्यापारी संघटना, कामगारांची निष्ठा या मुख्य कारणामुळें जपानला आपला माल स्वस्त देणें परवडलें. शिवाय औद्योगिक यशाचें निम्में श्रेय कामगारवर्गाकडे होतें. मध्यम आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचेहि पगार कमी आहेत. लोकांची साधी राहणी, त्यांचा काटकपणा, 'दीर्घोद्योग आणि' सर्वाहून श्रेष्ठ म्हणजे कर्तव्याशीं तादात्म्य पावण्याची हातोटी यामुळेंच जपानी लोक बाजारपेठा जिंकूं शकले. लोकांचा स्वाभाविक कल हस्तव्यवसायाकडे आणि यांत्रिक उद्योगाकडे आहे. आजच्या औद्योगिक युगाला अनुकूल असाच स्वभावगुण असल्यामुळें काळ आणि गुण यांची चांगली युति जमून आली.

स्वभावपरिचयः—जपानी लोकांची बुद्धि सामान्य पण वृत्ति कष्टाळू आहे. स्वतंत्र विचाराची संवय नाहीं, परंतु बौद्धिक कष्टाची तयारी दांडगी आहे. पण त्यांनीं बौद्धिक क्षेत्रांतील कमीपणा तांत्रिक क्षेत्रांत भरून काढला आहे. जपानी लोकांचा मेंदू त्यांचे हातांचे बोटांत आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

साधेपणांत उच्च प्रकारची अभिरुचि, हें जपानच्या रहाणीचें वैशिष्ट्य होय. हें तत्व घरांची बांधणी, आंतररचना, पोषाख, आहार, कला, करमणुकी इत्यादि सर्व क्षेत्रांत दिसून येते. गरीब आणि श्रीमंतांच्या गृहरचनेंत फार मोठी तफावत दिसून आली नाहीं.

वागण्यांत आणि भाषणांत सौजन्य आणि सभ्यपणा हे गुण समाजांतील वर पासून खालच्या थरांपर्यंत पसरलेले होते. घरांतील व दुकानांतील नोकर, पट्टेवाले, बसनियंत्रक वगैरे सर्व लोकांत परस्परांशीं व वरिष्ठांशीं वागण्यांत अगत्य, नम्रपणा, सौम्यवृत्ति व आनंद या भावना दिसून आल्या.

'स्वागत' हा तर त्यांच्या व्यावहारिक जीवनाचा आत्मा होता. कांहीं अपवाद सोडून दिल्यास एकंदरींत जपानी हा 'माणुसकी' बाळगून असे. कडक शिस्त आणि काटेकोरपणा यामुळें ते कडवेपणानें लढले. कांहीं वैयक्तिक बाबतींत विचार केला असतां खरोखरच त्यांनीं अमानुष अत्याचार केले; पण सर्वच चांगले कुठून मिळणार?

मला सुद्धां कांहीं बरेंवाईट अनुभव आले पण तेवढ्यावरून सबंध राष्ट्राविषयीं एखादा निवाडा देणें हें इष्ट नाहीं. (अपूर्ण)

## रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा व त्यांचें तारण

६-१२-४६

| | |
|---|---|
| इश्यू खात्याची जिंदगी = एकूण चलनी नोटा | रु. |
| अ सोनें व सोन्याचीं नाणीं:— | |
| हिंदुस्थानांतील साठा | ४४,४१,४५,००० |
| हिंदुस्थानाबाहेरील साठा | ... ... |
| स्टर्लिंग रोखे | ११,३५,३२,८९,००० |
| अची बेरीज | ११,७९,७४,३४,००० |
| ब रुपयाचीं नाणीं | २१,२६,८९,००० |
| हिं. सरकारचे रुपयांतील रोखे | ५७,८४,१४,००० |
| हुंड्या व इतर पतपत्रिका | ... ... ... |
| एकूण जिंदगी (चलनी नोटांची एकूण रक्कम) | १२,५८,८५,३७,००० |


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा:

ब्रँच सेक्रेटरी.

—दररोज लागणारें ताजें—

दहीं

शेरास १० आणे

म. गो. कुलकर्णी

किराणा-भुसार मालाचे व्यापारी

फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २

आंध्र खादीचे (म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे) —एकमेव विकेते—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर (बुधगांव) एम्. एस्. एम्. रेल्वे

नांगर —यांचे— चरक

किसान नं. १०१ (सहा ते आठ बैली) — विश्वास (चार बैली)

किसान नं. १०२ (चार ते सहा बैली) — वासुदेव (दोन बैली)

किसान नं. १०५ (दोन ते चार बैली) — राजा (एक बैली)

'मधुकर' (सात फण्याचे) कोळपें (दोन बैली)

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

—: पुणें शहर :—

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक )

**एकूण खेळतें भांडवल रु. ४८ लाखांचेवर**

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B. ( अध्यक्ष ) | श्री. बी. बी. वाळवेकर, M. L. A. ( उपाध्यक्ष ) |
| श्री. वि. वि. वर्तक | श्री. डी. डी. देशपांडे, B. E. ( Ele. & Mech. ) |
| शेट गोवर्धनदास विठ्ठलदास | श्री. के. बी. साळवेकर |
| सौ. इन्दुमतीबाई फडके, B. A. ( Hons. ) | श्री. बी. पी. केळकर |
| | श्री. बी. बी. माजेकर, B. A., B. Com., LL. B. |
| शेट वाडीलाल साकळचंद | |
| श्री. एम्. एन. परांजपे, B. Sc. | श्री. के. पी. जोशी |

( गतवर्षी ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे. )

* मुंबई, नगर, नासिक, बँगलोर, अर्सीकिरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B.  } मॅनेजिंग
नि. ना. क्षीरसागर } डायरेक्टर्स

## दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

हेड ऑफिस :

**१६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई**

एकूण खेळतें भांडवल : २,९०,००,००० रु.

वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : ११,६१,९४६ रु.

स्थानिक शाखा : १ दादर, २ गिरगांव, ३ ग्रँटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शीव, ७ विलेपार्ले.

इतर शाखा : ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ क्रॅडॉक टाऊन (सी. पी.), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव (पंजाब), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सितावर्डी, ४४ यवतमाळ.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

डी. एन. गांडेकर,
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर, पुणें शाखा.
(बुधवार चौक)

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. वा. पु. वर्दे, श्री. न. ग. पवार, श्री. श्री. गो. मराठे,
श्री. र. चिं. सोहनी, श्री. मा. रा. जोशी, श्री. फ. दो. पद्मजी,
श्री. म. वि. गोखले, श्री. मा. वि. शहा, श्री. शं. ल. किर्लोस्कर

—भाण्डवल—

अधिकृत रु. ५०,००,००० खपलेलें रु. २५,००,०००
जमा रु. १२,५०,००० रिझर्व्ह व इतर फंड रु. ३,००,०००

एकूण खेळतें भाण्डवल रु. २,००,००,०००

—:शाखा:—

डेक्कन जिमखाना, खडकी, मुंबई (फोर्ट), गिरगांव, कल्याण, जळगांव, नागपूर, कोपरगांव, रत्नागिरी, सोलापूर, नाशिक, हुबळी, धुळें, चाळिसगांव व फैजपूर ( पे-ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**एक्झिक्यूटर व ट्रस्टी कंपनीचे कामास सुरवात झाली आहे.**

सी. व्ही. जोग
मॅनेजर

## दि रत्नाकर बँक लिमिटेड.

ऑफिसें:—१ कोल्हापूर, २ सांगली, ३ शाहुपुरी, ४ मिरज, ५ जयसिंगपूर.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ६,२७,१०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३१,००,००० |

खेळतें भांडवल अंदाजें ३० लाखांवर

—: अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात. :—

## सन १९४५ मधील प्रगति

नवें काम ७,००,००० रु.
चालू काम १०,००,००० रु.
१९४५ मधील हप्त्यांचें उत्पन्न सुमारें १,००,००० रु.
खर्चाचें प्रमाण फक्त ११%

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

**दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.**

आर. जी. साठे
सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर

# मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

व्याज–वजा

शिंदिया स्टीम रु. १–४–० दि. २०–१–४७

बॉम्बे बर्मा रु. १० दि. ९–१–४७

व्याज–वजा

बेलापूर रु. ९ दि. १५–१–४७

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १०।१२।४६ | बुधवार ११।१२।४६ | गुरुवार १२।१२।४६ | शुक्रवार १३।१२।४६ | सोमवार १६।१२।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६७५; १९८० | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २७८२—८ | २७५७–८ | २७६७–८ | २७७१–४ | २७५७–८ |
| ४८०; ३७२ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५०३—० | ४९८ | ५०१ | ५०२ | ५०१ |
| २२२-८; १७६२-१२ | २५–०–०† | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २६५० | २६४२–८ | २६३० | २६३७–८ | २६२५ |
| ७०२; ५६६ | १२–०–०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ८८० | ८६९ | ८७५ | ८७७ | ८७३ |
| ६६८; ५०७ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ७०६ | ७०२ | ७०४ | ७०७ | ७०८ |
| ४४३–८; ३६० | ७–०–०S | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | ४०७ | ४०८ | ४१० | ४१० | ४११ |
| ३४२–०; २७५ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ३७६—८ | ३७३ | ३७५ | ३७७ | ३७६ |
| ३३५; २८३-८ | ६–०–०† | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३६५ | ३५९ | ३६१ | ३६४ | ३६१ |
| ३३७; २४३ | ९–०–०S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४१६—८ | ४१६–८ | ४१७–८ | ४१८ | ४१७–८ |
| ५; ३-११-० | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ५—२ | ५—१ | ५–१–६ | ५–१–६ | ५–१–९ |
| १७-१०; १३-७-० | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १९–१२ | १९–९ | १९–१५ | २०–० | १९—१५ |
| ३-१०; २-९ | ०–३–० | मे | ,, डिफर्ड्स | १ | ४–५–६ | ४–३–६ | ४–४–६ | ४—५ | ४—६ |
| ७९०; ६४५ | ४१–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७६५ | ७५१—४ | ७६२–८ | ७७२–८ | ७७१–४ |
| २४३–८; २०६-८ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३१–४ | २२९–१२ | २३० | २३०–८ | २३०–१२ |
| २५६; २१३-८ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३५२ | ३४९ | ३४९ | ३४९–८ | ३४८ |
| ५९२–८; ५१०-० | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६६७–८ | ६६२–८ | ६७७–८ | ६७८–१२ | ७१७–८ |
| ४३-७; ३०-१२ | १–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४६—२ | ४५—६ | ४६–८ | ४६—४ | ४६—६ |

सोमवार दि. ३०–१२–४६ चे भाव

| बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बरोडा | १८२–० | आंध्र व्हॅली | १८५० | अलकॉक | ५८५—० |
| सेंट्रल | १२१–० | बॉम्बे ट्रॅम | १२७ | बॉबे स्टीम | ७३५—० |
| इंडिया | २४१–० | टाटा हायड्रो | २०९–८ | न्यू इंडिया | १०१—० |
| इंपी० | २७३० / ६७७–८ | टाटा पॉवर | १९४९–१२ | शिवराजपुर | ४८—८ |
| रिझर्व्ह | १५०–० | | | टाटा केमिकल | १८—० |
| | | | | टाटा ऑईल | १०१—० |

## व्याजाचें घातुक आकर्षण

### हावरेपणाचें प्रायश्चित्त

बंगलोरमधील एका बँक कारकुनानें तीन वर्षेपर्यंत हावऱ्या लोकांना नादी लावून असेर दिवाळें कसें काढलें ह्याची हकीकत प्रसिद्ध झाली आहे. मि. गोपाळराव, ह्यानें श्रीमंत होण्याची घाई असणारांकडून ३० तें ५० टक्के व्याजानें ठेवी घेण्यास प्रारंभ केला. ठेवीदारानें ठेव दिली, कीं गोपाळराव ठेवीच्या परतफेडीचा बिन–तारखेचा चेक त्यास देत असे व व्याजाच्या चेकवर तारीख घालीत असे. ठेवीदारांना केव्हांहि शंका आली, तर ते बिन तारखेच्या चेकवर तारीख टाकून त्याचे पैसे बँकेंतून काढून घेण्यास मोकळे होते. भरमसाट व्याजाच्या रकमेचे चेक ठराविक दिवशीं वटले जात. ह्याप्रमाणें, गोपाळरावांच्या व्यवहारावर लोकांचा प्रचंड विश्वास बसला व सुमारें तीन वर्षें हा प्रकार चालू होता. म्हैसूर संस्थानांतील सर्व दर्जांच्या लोकांनीं (युरोपियन भांडवलदार, सरकारी अधिकारी, सेवानिवृत्त ॲंग्लोइंडियन व हिंदी अधिकारी, विधवा स्त्रिया, मध्यमवर्गीय लोक इ.) गोपाळरावांना स्वखुषीनें दिलेल्या ठेवींची रक्कम डिसेंबर १९४६ च्या प्रारंभीं ४ कोटि रुपयांवर भरली! एका ठेवीदारानें आपला १ लक्ष रुपयांच्या ठेवीचा चेक वटविण्यासाठीं बँकेकडे धाडला, त्याचे पैसे त्याला मिळाले नाहींत. ही बातमी, तावडतोब सर्वत्र पसरली आणि शेकडो ठेवीदारांनीं बँकेकडे आपल्या ठेवींच्या चेकच्या पैशाची मागणी केली, परंतु त्या सर्वांची निराशा झाली! धर्मरत्नकार गोपाळराव ह्यांना पोलिसांनीं अटक केली असून, त्यांच्याबाबत चौकशी चालू आहे. गोपाळरावांच्या व्यवहारामुळें, म्हैसूर संस्थानांतील हजारों लोकांचें अतोनात नुकसान झालें आहे व पैशाची हाव त्यांना असेर घातुक ठरली आहे. चांगलें व्याज वक्तशीर मिळत गेल्या कारणानें, हातांत मुद्दलाच्या परतफेडीचे चेक असूनहि लोक मुद्दल परत घेण्यास तयार नव्हते. जनतेंत खोटा विश्वास निर्माण झाला आणि असेर व्हावयाचें तेंच झालें. म्हैसूर विधिमंडळांत ह्याबाबत एक सभातहकुबीची सूचना ता. १४ रोजीं मांडण्यांत आली होती.

**कै. प्रोफेसर काळे ह्यांच्या चित्राचें अनावरणः**—महाराष्ट्र इं. इ. लि., पुणें ह्या कंपनीची वार्षिक सभा सोमवार, ता. १६ रोजीं झाली. ४% डिव्हिडंड देण्याचें ठरलें. त्यानंतर, कंपनीचे संस्थापक-अध्यक्ष कै. प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या चित्राचा अनावरण समारंभ श्रीमंत ग. वि. साळवेकर ह्यांच्या हस्तें करण्यांत आला. त्यावेळीं अध्यक्ष व प्रा. द. गो. कर्वे ह्यांचीं भाषणें झालीं.

**ब्रह्मदेशाचें स्वतःचें चलन**—ब्रह्मी सरकारनें करन्सी कॉयनेज ॲक्ट गॅझिटांत प्रसिद्ध करून, स्वतःच्या चलनी नोटा व नाणीं सुरू करण्याचें जाहीर केलें आहे. सध्यां ब्रह्मदेशांत हिन्दी चलन व नाणीं चालू आहेत. नव्या ब्रह्मी रुपयाची किंमत १ शि. ६ पेन्स इतकीच राहील. स्टर्लिंग रोखे हेच मुख्यतः चलनास तारण पुरवतील.

**दि बेलापूर कंपनी लि.**—वरील कंपनीस ३० सप्टेंबर १९४६ असेर संपलेल्या वर्षी १० लक्ष, ५२ हजार रु. निवळ नफा झाला. भागीदारांना ९% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे." मजुरांचा तुटवडा भासला. खतांचा पुरवठा नीट झाला नाहीं. त्यामुळें उंसाचें पीक युद्धपूर्व दर्जास पोचलें नाहीं. उंसाखालीं एकूण ३,८७० एकर जमीन आहे." कंपनीचें वसूल भांडवल ३७ लक्ष, ५९ हजार रु. असून रिझर्व्ह फंड १५ लाखांचेवर आहे. साखर विकून कंपनीस ४१½ लक्ष रु. मिळाले.

## लिमिटेड कंपन्यांची प्रगति

### अर्कावती एस्टेट्स लि., बंगलोर

( चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर : श्री. नारायणराव जी. नाईक )

के. मि. मॅक ऐर्डेक यांच्या मालकीची बंगलोर शेजारची गंगेनहळ्ळी एस्टेट विकत घेऊन ती किफायतशीरपणें चालविण्यासाठी मुख्यतः वरील खासगी लिमिटेड कंपनी श्री. नारायणराव नाईक ह्यांनीं नुकतीच स्थापन केली आहे. कंपनीचें भांडवल ५ लक्ष रुपये आहे. प्रत्येक डायरेक्टरानें किमान २५ हजारांचे भाग घेतले आहेत. श्री. नाईक, श्री. चिनाई, श्री. जी. व्ही. साळवेकर, श्री. एस. के. रानडे, श्री. व्ही. डी. देसाई, श्री. लक्ष्मीचंद लालजी व श्री. जी. डी. गोखले ही मंडळी कायम डायरेक्टर्स आहेत. श्री. नारायणराव नाईक हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. अर्कावती एस्टेट सुमारें १,७०० एकरांची असून, तिचा स्वतःचा पाणी पुरवठा स्वतंत्र आहे आणि वीज सर्वत्र खेळवण्यांत आली आहे. एस्टेटमधील बंगलाहि भव्य व सुसज्ज आहे. आज ह्या एस्टेटमध्यें तुतीची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यांत आली असून, पपया, केळी, चिकू, मिरच्या, भाज्या, इत्यादींचेहि मळे त्यांत आहेत. बंगलोरचें सान्निध्य आणि तयार झाडें ह्यांचा कंपनीस चांगला फायदा होत आहे आणि नव्या योजना हातीं घेण्याचा कंपनीचा विचार आहे.

---

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें

( वार्षिक सभा ३१-१२-४६ )


घसारा व मॅनेजिंग एजंटांचें कमिशन वजा घालून, वरील कंपनीनें ३०-९-४६ अखेर संपलेल्या वर्षीं १ लक्ष, ६ हजार रुपये नफा मिळविला आहे. कंपनीनें एकूण २८ लक्ष, ६० हजार रुपयांच्या साखरेची विक्री केली; ३ लक्ष, ४९ हजार रु. एक्साइज ड्यूटी भरली; ३ लक्ष, ७४ हजार रु. व्याज दिलें व ७९,८४३ रुपये घसारा काढला. सरकारनें गूळ करण्यास नकार दिल्याकारणानें उसाखालील क्षेत्र आणखी कमी करावें लागलें. सध्या १,४९६ एकरांत उसाची लागवड केलेली आहे, त्यांपैकीं ९०० एकर ऊस १९४६-४७ मधील मोसमासाठी आहे. दररोज एक हजार टन ऊस गाळण्याची शक्ती असणारी यंत्रसामुग्री कंपनीनें मागविली आहे. डिस्टिलरीच्या उभारणीचीहि चांगली प्रगति झाली आहे. अहवालाचे वर्षीं कंपनीचें २०% वाढाव्यानें विक्रीस काढलेले ४ लाखांचे सर्व शेअर्स खपून गेले.

---

**गोवर्धन डेअरी फार्म्स लि. पुणें**—वरील कंपनीनें ३१ ऑगस्ट १९४६ अखेर संपलेल्या पहिल्या वर्षीं २३,३३५ रुपयांची विक्री केली आणि २,०८६ नफा मिळवला त्यांतून ६% क्यू. प्रे. भागीदारांना डिव्हिडंड देण्यास ८३०. रु. लागतील. ऑर्डिनरी भागांवर ३% डिव्हिडंड देण्याकडे ५४१ रुपयांचा विनियोग केला जाईल. कंपनीचें ५७,५१० रुपयांचें भांडवल खपलें असुन वसूल भांडवल ४७,३०५ रुपये आहे. एकूण ताळेबंद १,२८,८६८ रुपयांचा आहे. सरदार के. आर. विंचूरकर हे डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन असून मेसर्स सोलापूरकर अँड डोणवाड ह्यांचेकडे मॅनेजिंग एजन्सी आहे. डायरेक्टर बोर्डांत सरदार व्ही. डी. पानसे, श्री. जी. व्ही. साळवेकर, रावसाहेब वाय. डी. खोले वगैरे मंडळी आहेत.

---

**सातारा स्वदेशी कमर्शिअल कं. लि., सातारा**—वरील बँकेनें ३० जून, १९४६ अखेरच्या अहवालाचे वर्षीं ४ लक्ष रुपयांचे ८,००० साधारण भाग विक्रीस काढले ते सर्व खपले. वसूल भांडवल ३६,२८० रुपयांचें २,१८,९९० रु. झालें आहे. खेळत्या भांडवलांतहि सुमारें ८ लाखांची वाढ झाली आहे आणि नफ्याचा आकडा ५,०६६ रु. वरून १३,०२५ रु. वर गेला आहे. साधारण भागीदारांना करमाफ ७% डिव्हिडंड देण्याचें ठरलें आहे. रिझर्व्ह फंडांत २,९०० रु. जातील व एकूण फंड ५२,४०० रुपयांचे होतील. ३९½ लक्ष रुपयांच्या ठेवींपैकीं २६½ लक्ष रुपये मुदती ठेवींत आहेत. श्री. चिरमुले ह्यांच्या मार्गदर्शनाखालीं बँकेनें मजबुती कायम राखून प्रगति चालविली आहे.

पेडणेकर आणि कंपनी लि.,

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी



मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.